# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः25.03.2025** **वारःमंगळवार**

---

1. केंद्रसरकारी योजनांचा लाभ घेऊन आदिवासी समाजाने आत्मनिर्भरतेच्या दिशेने वाटचाल करावी, राष्ट्रपतींचं आवाहन
2. धर्माधारित आरक्षणाबाबत कर्नाटकच्या उपमुख्यमंत्र्यांच्या टिप्पणीवरुन संसदेच्या दोन्ही सभागृहांच कामकाज विस्कळीत.
3. मेक इन इंडिया उपक्रमांतर्गत 2023-24 वर्षात स्वदेशी संरक्षण उत्पादनांचा उच्चांक आणि
4. मियामी खुल्या टेनिस स्पर्धेत भारताच्या युकी भांब्रीचा पोर्तुगीज जोडीदारासह उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

**राष्ट्रपती**

आदिवासी समाजाने केंद्रसरकारी योजनांचा लाभ घेऊन आत्मनिर्भरतेकडे वाटचाल केली पाहिजे, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी काल केलं. ओडिशाच्या नयागड जिल्ह्यात कालियापल्ली इथल्या भारतीय विश्वबसू शबरा समाजाच्या स्थापना दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. केंद्र सरकार आदिवासी भागात गुणवत्तापूर्ण शिक्षण, कौशल्य विकास आणि मोबाईल संपर्कजाळ्यासह मूलभूत सुविधा अधिक चांगल्या करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचं सांगितलं. राष्ट्रपती कालपासून दोन दिवसाच्या ओडिसा दौऱ्यावर आहेत. 2047 पर्यंत विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी, देशातल्या आदिवासी गटांना मुख्य प्रवाहात आणण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. शिक्षित होऊनच आदिवासी केंद्र सरकारच्या विविध योजनांची माहिती आणि लाभ घेऊ शकतील असे त्या म्हणाल्या.

**कर्नाटक शिवकुमार**

कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी एका विशिष्ट अल्पसंख्याक समूहाला आरक्षण देण्यासाठी संविधानामध्ये बदल करण्याविषयी केलेल्या टिप्पणीवरून काल संसदेच्या दोन्ही सभागृहांचे कामकाज वारंवार तहकूब करावे लागले. राज्यसभा दिवसभरासाठी तर लोकसभेचे कामकाज या मुद्द्यावरून दोन वेळा तहकूब झाले. दुपारनंतर लोकसभेचे कामकाज पुन्हा सुरू झाल्यानंतर गोंधळाच्या वातावरणातच तेलक्षेत्र विनियन आणि संशोधन सुधारणा विधेयक तसंच 2024 मध्ये लोकसभेने केलेल्या काही सुधारणांना मान्यता देण्यात आली. ही विधेयके राज्यसभेत यापुर्वीच मंजूर झाली आहेत. राज्यसभेचे कामकाज स्थगित होण्यापुर्वी, विरोधी पक्षनेते मल्लिकार्जून खर्गे यांनी कर्नाटकचे उपमुख्यमंत्री संविधान बदलाबाबत काहीही बोलले नसल्याचं सांगून त्याउलट सत्ताधारी पक्षाचे

नेतेच अनेकदा संविधान बदलाबाबत बोलत असल्याचं म्हणाले. खरगे यांना प्रत्युत्तर देताना सभागृह नेते जेपी नड्डा यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि सरदार वल्लभभाई पटेल आरक्षणाविरोधात असल्याचं सांगितलं. तर संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी धर्मावर आधारित आरक्षणाचा मुद्दा 1947 मध्ये पुढे आला होता मात्र तो सर्वपक्षीय नेत्यांनी फेटाळल्याचं अधोरेखित केलं.

**न्यायव्यवस्था रोख**

न्यायव्यवस्थेत होत असलेल्या रोख रकमेच्या वसुलीसारख्या घटना रोखण्यासाठी कारवाई करण्याची गरज राज्यसभेचे अध्यक्ष आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी व्यक्त केली. दिल्ली उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या निवासस्थानी जप्त करण्यात आलेल्या रोख रकमेच्या मुद्द्याबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली. अशा प्रकारच्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी ती रोखण्याचे आवाहन धनखड यांनी केले आहे. यासंदर्भात, सभागृहाचे नेते जे.पी. नड्डा आणि विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांच्याबरोबर त्यांनी चर्चा केली. या प्रकरणी सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी तत्काळ केलेल्या कारवाईचं कौतुक केलं.

**विधिमंडळ**

क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना मरणोत्तर ‘भारतरत्न’ पुरस्काराने सन्मानित करण्याचा ठराव काल महाराष्ट्राच्या विधीमंडळात एकमतानं मंजूर करण्यात आला. विधानसभेत राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी हा ठराव मांडला. हा ऐतिहासिक ठराव एकमताने मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाधान व्यक्त केले. हा निर्णय महाराष्ट्राच्या प्रगतीशील आणि समतावादी भूमिकेला अधोरेखित करणारा असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्र्यांनी दिली आहे.

**मनकीबात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या रविवारी 30 एप्रिल रोजी आकाशवाणीवरील मन की बात या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा 120 वा भाग असेल. त्यासाठी जनतेकडून विविध सूचना, संकल्पना मिळाल्याविषयी आनंद झाल्याचं पंतप्रधानांनी काल समाजमाध्यमांवरील संदेशात म्हटले आहे. सामाजिक कल्याणासाठी केल्या जाणाऱ्या सामूहिक प्रयत्नांची ताकद यामुळे अधोरेखित होत असल्याचं सांगून, आगामी भागासाठी 28 तारखेपर्यंत 1800-11-7800या क्रमांकावर, नरेंद्र मोदी अँप आणि माय जीओव्ही यांवर सूचना पाठवाव्यात असं संदेशात नमूद केलं आहे.

**संरक्षण उत्पादन**

मेक इन इंडिया उपक्रम सुरू झाल्यापासून 2023-24 या वर्षात भारतानं एक लाख 27 हजार कोटी रुपये किंमतीच्या संरक्षण सामग्रीचं उत्पादन केलं असून स्वदेशी संरक्षण उत्पादनाचा हा आजवरचा उच्चांक आहे. स्वदेशी संरक्षण उत्पादनाच्या मूल्यात 2014-15 मधील 46 हजार 429 कोटींवरून 174 टक्क्यांची वाढ झाली असल्याचं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे. एकेकाळी परदेशी पुरवठादारांवर अवलंबून असलेला देश आता स्वदेशी सामग्रीच्या

निर्मितीतीतल ताकद म्हणून उदयास आला असून स्वदेशी सामग्रीद्वारे देशाच्या लष्करी सामर्थ्यात भर घालत आहे, असंही मंत्रालयानं पुढे म्हटलं आहे.

**कांदा निर्यात**

केंद्र सरकारनं कांद्यावरील निर्यात शुल्क पूर्णपणे रद्द केल्याची माहिती केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी काल दिल्लीत वार्ताहरांशी बोलताना दिली. या निर्णयामुळे, कोणत्याही शुल्काशिवाय शेतकऱ्यांचं उत्पादन जागतिक बाजारपेठेत पोचणार असून, त्यांना अधिक किंमत मिळेल. शेतकऱ्यांच्या हिताला केंद्र सरकारचं सर्वोच्च प्राधान्य असल्याचं सांगून चौहान म्हणाले....

***प्याज पर चालीस पर्सेंट एक्सपोर्ट ड्यूटी लगती थी लेकिन जब प्याज के दाम कम होने शुरू हुए और किसान को कम दाम मिलना प्रारंभ हुए तब सरकार ने एक फैसला पिछले दिनों किया था कि प्याज अगर एक्सपोर्ट करते हैं तो एक्सपोर्ट ड्यूटी घटा के चालीस पर्सेंट से बीस पर्सेंट कर दी जाए और अब ये फैसला किया है कि बीस पर्सेंट एक्सपोर्ट। ड्यूटी को भी घटा के जीरो कर दिया जाए। प्याज के एक्सपोर्ट पर अब कोई एक्सपोर्ट ड्यूटी नहीं लगेगी ताकि हमारे किसानों द्वारा मेहनत से उपजाया हुआ प्याज दुनिया के बाजारों में बिना एक्सपोर्ट ड्यूटी के जाए और किसानों को अच्छे दाम मिल पाएं लाभकारी मूल्य मिल पाए।***

**अजय सेठ**

सनदी अधिकारी अजय सेठ यांची काल केंद्रीय वित्त मंत्रालयाचे नवीन सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली. सेठ 1987 च्या तुकडीचे कर्नाटक केडरचे अधिकारी आहेत. सध्या ते वित्त मंत्रालयाच्या आर्थिक व्यवहार विभागाचे सचिव आहेत.

**सेबी गुंतवणूक मर्यादा**

भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ म्हणजेच सेबीनं, परदेशी गुंतवणूकदारांसाठी सूक्ष्म किंवा विस्तृत प्रकटीकरणासाठीची गुंतवणूक मर्यादा वाढवून दुप्पट करत ती पन्नास हजार कोटी रुपये करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. सेबीचे नवनियुक्त अध्यक्ष तुहिन कांता पांडे यांनी काल मंडळाच्या पहिल्या बैठकीनंतर झालेल्या वार्ताहर परिषदेत ही घोषणा केली. या निर्णयामुळे भारतीय बाजारात पन्नास हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक इक्विटी मालमत्ता व्यवस्थापनाखालील परदेशी आर्थिक गुंतवणूकदारांना अतिरिक्त जाहीर प्रकटन करावे लागणार आहे.

**क्षयरोग**

देशातल्या सर्वच जिल्ह्यांमध्ये क्षयरोग निर्मूलनाची मोहीम विस्तारीत स्वरुपात राबवण्यात येईल अशी घोषणा केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांनी केली आहे. जागतिक क्षयरोग दिनानिमित्त काल दिल्लीत आयोजित शिखर परिषदेला नड्डा संबोधित करत होते. यापुर्वी 455 निवडक जिल्ह्यांमध्ये ही मोहीम राबवण्यात आल्याचं नड्डा यांनी सांगितलं. 100 दिवसांच्या अभियानादरम्यान 13 कोटी लोकांची क्षयरोग तपासणी करण्यात आली, त्यामध्ये सात

लाखांहून अधिक नवीन क्षयरुग्ण आढळून आले. देशात क्षयरोग उपचारांची व्याप्ती एकोणसाठ टक्क्यांवरून पंच्च्याऐंशी टक्क्यांपर्यंत वाढल्याचंही नड्डा यांनी नमूद केलं.

**<u>युनिसेफ-बांग्लादेश</u>**

बांग्लादेशच्या अंतरिम सरकारनं घेतलेल्या मुलांच्या हक्क आणि कल्याणाचे समर्थन करणारी बालअनुकूल न्यायव्यवस्था राबवण्याच्या निर्णयाचं संयुक्त राष्ट्र बाल निधी म्हणजेच युनिसेफने स्वागत केलं आहे. बालकायदा 2013 ची अंमलबजावणी करण्याच्या बांग्लादेशच्या वचनबद्धतेला बळकटी देणारा हा निर्णय असल्याचं युनिसेफनं म्हटलं आहे.

**<u>टेनिस</u>**

मियामी खुल्या टेनिस स्पर्धेत भारताच्या युकी भांब्रीनं त्याचा पोर्तुगीज जोडीदार नुनो बोर्जेस यांच्या साथीनं पुरूष दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. आज होणाऱ्या या सामन्यात भारतीय पोर्तुगीज जोडीचा सामना इंग्लंडच्या लॉयड ग्लासपूल आणि ज्युलियन कॅश जोडीशी होणार आहे.

**<u>न्युझीलंड-भूकंप</u>**

न्यूझीलंडच्या रिव्हरटन किनाऱ्याला तीव्र भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. रिख्टर स्केलवर त्याची तीव्रता 6 पूर्णांक 8 दशांश असल्याचं समजत आहे. स्थानिक आपत्ती व्यवस्थापन दलानं साउथलँड आणि फिओर्डलँडमधील रहिवाशांना समुद्रकिनारा आणि सागरी क्षेत्रांपासून दूर राहण्याचा सल्ला दिला आहे. याबाबत अधिक तपशीलांची प्रतीक्षा आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.